**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.वाशदेव के.इदनानी
रा.२७/३, पी.डब्ल्यू.डी.क्वॉर्टर्स,
पिंपरी कॉलनी, पुणे ४११०१७ — अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) — उत्तरवादी
जिल्हा परिषद, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४५८ / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ७.८.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.वाशदेव के.इदनानी
रा.२७/३, पी.डब्ल्यू.डी.क्वॉर्टर्स,
पिंपरी कॉलनी, पुणे ४११०१७

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, पुणे
श्री.सुखदेव कोंडाजी बनकर

**जन माहिती अधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, पुणे
श्री.प्रकाश मेघ:श्याम परब

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ९.१२.२००५ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १०.१.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १८.१.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १२.४.२००६ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>सन २००० पासून जयहिंद सिंधू एज्युकेशन ट्रस्टचे जयहिंद हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, पिंपरी या संस्थेने प्रत्येक विद्यार्थ्याकडून विकास निधी २००/- रुपये, संगणक शुल्क ३००/- रुपये, क्रीडा शुल्क-२००/- रुपये, संकीर्ण-१२०/- रुपये असे शुल्क घेतले आहे. शाळेला असे शुल्क घेण्याचा अधिकार आहे काय, नसल्यास या संस्थेविरुध्द काय कारवाई करणार व केव्हा करणार, तसेच घेतलेले शुल्क परत देणार काय? | |

## विवेचन

पिंपरीमधील जयहिंद सिंधू एज्युकेशन ट्रस्टच्या जयहिंद हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज तर्फे प्रत्येक विद्यार्थ्याकडून विकास निधी २००/- रुपये, संगणक शुल्क ३००/- रुपये, क्रीडा शुल्क-२००/- रुपये, संकीर्ण शुल्क १२०/- रुपये घेतले जाते. असे शुल्क घेण्याचा संस्थेला अधिकार आहे काय, नसला तर संस्थेविरुध्द काय कारवाई केली जाईल, संभवतः बेकायदेशीररीत्या घेतलेले शुल्क पालकांना परत केले जाईल काय व केव्हा, अशी माहिती अपीलकर्ता श्री.वाशदेव के. इदनानी यांनी जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी(माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे यांच्याकडे मागितली होती. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी श्री.टी.एन.सुपे यांनी विहित मुदतीत उत्तर दिले. परंतु ते दिशाभूल करणारे असल्याच्या कारणावरुन व त्यांना दंड करण्याची मागणी करणारे अपील श्री.इदनानी यांनी अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प., पुणे यांच्याकडे केले. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी चार दिवसात या संदर्भात अहवाल सादर करावा

व माहिती संबंधितांना पाठवावी, असा निर्णय अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिला. त्यानुसार अहवाल सादर होऊनही आपल्याला माहिती मिळाली नाही व अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या आदेशाची अंमलबजावणी झाली नाही, म्हणून श्री.इदनानी यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

संस्थेला अशा प्रकारचा निधी स्वतंत्ररीत्या घेता येत नाही, त्याबाबत चौकशी करुन नियमाप्रमाणे पुढील कारवाई केली जाईल, असे उत्तर तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. सुपे यांनी दिले. श्री.इदनानी यांनी विचारलेल्या प्रश्नांना आवश्यक ती उत्तरे त्यांनी दिली. वस्तुतः कोणती कारवाई करणार, केव्हा करणार, अशा प्रकारचे प्रश्न 'माहिती ' या सदरात येत नाहीत. तरीही तत्कालीन जन माहिती अधिकाऱ्यांनी उत्तर दिले, असे विद्यमान जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक ) श्री.प्रकाश मेघश्याम परब यांनी आयोगापुढील सुनावणीत सांगितले. तसेच अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या निर्णयानंतर शिक्षण विस्तार अधिकारी श्रीमती राऊत यांच्याकरवी चौकशी करण्यात आली. शाळेने घेतलेला निधी नियमबाह्य असल्यामुळे परत करावा, अशी शिफारस त्यांनी केली. त्यानुसार श्री.सुपे यांनी संबंधित शुल्क पालकांना परत करण्याचा आदेश संस्थेला दिला. परंतु संस्थेने शिक्षण उपसंचालक, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे याविरुध्द अपील केले. त्यावर फेरचौकशी करण्याचा आदेश शिक्षण उपसंचालकांनी शिक्षणाधिकाऱ्यांना दि.१२.६.२००७ रोजी दिला. शिक्षणाधिकाऱ्यांना हे आदेश जून अखेरीस मिळाले असून सप्टेंबरमध्ये चौकशी पूर्ण करुन अहवाल देण्यात येणार आहे, असे श्री.परब यांनी सांगितले.

संस्थेकडून घेतले जाणारे शुल्क बेकायदेशीर व नियमबाह्य आहे, शिक्षणाधिकारी श्री.सुपे यांनी दिलेले उत्तर वरवरचे व संस्थेला पाठीशी घालणारे आहे, त्यामुळे आपण अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांच्याकडे अपील केले. त्यांच्या आदेशानुसार चार दिवसात आपल्याला माहिती मिळणे आवश्यक होते. परंतु अहवालाची प्रत आपल्याला दिली गेली नाही. शिक्षणाधिकारी श्री.सुपे व तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे श्री.राजेंद्र चव्हाण यांना आपण स्मरणपत्रे दिली. परंतु त्याची दखल घेतली गेली नाही. संस्थेला व आदेशाचे पालन न करणाऱ्या अधिकाऱ्यांना पाठीशी घालण्याचा हा प्रकार आहे असे प्रतिपादन श्री.इदनानी यांनी केले. परंतु श्री.परब व प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे श्री.सुखदेव कोंडाजी बनकर यांनी त्याचा इन्कार केला व

चौकशीसंबंधीची योग्य ती प्रक्रिया पार पाडूनच आवश्यक ती कार्यवाही केली जाईल, असे प्रतिपादन केले.

एप्रिल १९९९ पासून इमारत दुरुस्ती आदिसाठी रु.२००/-, शासन निर्णयानुसार मान्यता असलेले संगणक शुल्क ३००/- रुपये, दिनदर्शिका; ओळखपत्रे; उत्तरपत्रिका आदि साहित्यासाठी संकीर्ण शुल्क रुपये १२०/- घेतले जाते, क्रीडा शुल्क तेव्हा आकारले जात नव्हते. एप्रिल १९९९ ते डिसेंबर २००५ या काळात श्री.इदनानी यांच्यासह कोणत्याही पालकाने या शुल्काला आक्षेप घेतला नव्हता, श्री.इदनानी पालक शिक्षक संघाचे उपाध्यक्ष असताना पालक शिक्षक संघाच्या बैठकीत अशा शुल्काला आवश्यक ती मान्यता घेण्यात आली होती. विद्यार्थ्यांकडून ही रक्कम बँकेच्या खात्यात थेट जमा केली जाते, त्याचा हिशेब अधिकृतपणे सादर केला जातो. अनधिकृतपणे कोणताही निधी अथवा प्रवेशासाठी देणग्या संस्थेकडून घेतल्या जात नाहीत, असे संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती नलिनी गेरा यांनी लेखी व तोंडी नमूद केले. श्रीमती गेरा यांनी नमूद केलेल्या पालक शिक्षक संघाच्या सभेला आपण उपस्थित होतो व त्यावेळी आपण आक्षेप घेतला नव्हता, हे त्यांनी मान्य केले. संस्थेला त्रास देण्याच्या उद्देशाने श्री.इदनानी माहितीच्या अधिकाराचा वापर करीत असून आतापर्यंत त्यांनी किमान ३० अर्ज केले आहेत, असेही प्रतिपादन श्रीमती गेरा यांनी केले. माहितीच्या अधिकाराखाली माहिती मागणे हा आपला हक्क आहे, संस्थेला त्रास देण्यासाठी आपण हे करीत नसून संस्थेत बेकायदेशीर गोष्टी घडू नयेत यासाठीच आपण माहिती मागत आहोत, अशी भूमिका श्री.इदनानी यांनी मांडली.

जन माहिती अधिकारी, अपिलीय प्राधिकारी, तसेच संस्था चालक या सर्वांवर श्री.इदनानी यांनी वेगवेगळ्या प्रकारचे आरोप केल्याचे त्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांतून दिसते. अपिलीय प्राधिकाऱ्यांना त्यांनी दिलेल्या स्मरणपत्रामध्ये काही अधिकाऱ्यांचा नामोल्लेख करुन, संगनमताने गैरगोष्टीना पाठीशी घातले जात असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी झाली नाही म्हणून आदेशाचा भंग करणाऱ्या अधिकाऱ्यांना पाठीशी घालत असल्याचा आरोप श्री.इदनानी यांनी त्यांच्यावरही आयोगाकडील अपिलात केला आहे. माहिती देणे टाळण्याचा सारांश असलेले हे आरोप आयोगाला सादर करण्यात आलेली कागदपत्रे व निवेदने यातून सिध्द होत नाहीत.

संस्था घेत असलेल्या शुल्काच्या कायदेशीरपणाबाबतची चौकशी व निर्णय, अनुषंगिक कारवाई ही प्रशासकीय बाब असून केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही. मात्र या संदर्भात त्यांनी मागितलेली आवश्यक ती माहिती त्यांना दिली गेली पाहिजे.

शिक्षण विस्तार अधिकारी श्रीमती राऊत यांनी चौकशी अहवाल सादर केल्यानंतर श्री.सुपे यांनी शुल्क परतीचा आदेश संस्थेला दिला. म्हणजे कार्यवाही केली, परंतु त्याची माहिती श्री.इदनानी यांना दिली गेली नाही. अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या आदेशानुसार ती दिली जाणे आवश्यक होते. याबाबतीत जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी श्री.सुपे यांनी अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या आदेशाचा भंग केल्याचे विद्यमान अपिलीय प्राधिकारी तथा प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.बनकर यांनी मान्य केले. संस्थेच्या अर्जानुसार शिक्षण उपसंचालकांनी श्री.सुपे यांच्या आदेशाला स्थगिती देऊन फेरचौकशीचा आदेश दिला. ही चौकशी पूर्ण होऊन सप्टेंबर २००७ मध्ये सादर केल्या जाणाऱ्या अहवालाची प्रत, तसेच त्यानुसार केल्या जाणाऱ्या कार्यवाहीची माहिती श्री.इदनानी यांना द्यावी, असा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला होता. परंतु दि.२३.११.२००७ पर्यंत चौकशी अहवाल सादर झाला नसल्याचे, आयोगाने विचारणा केली असता शिक्षणाधिकारी कार्यालयाने स्पष्ट केले. श्री.इदनानी यांना ही माहिती कळविली जाणे उचित ठरले असते.

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी आणि जयहिंद सिंधू एज्युकेशन ट्रस्ट या सर्वांची निवेदने व सादर केलेली कागदपत्रे यांचा विचार करुन आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

## आदेश

(१) अपील अंशत: मान्य.

(२) शिक्षण उपसंचालकांच्या आदेशाप्रमाणे केल्या जाणाऱ्या फेरचौकशी अहवालाची प्रत व त्यानुसार शिक्षण अधिकाऱ्यांमार्फत केल्या जाणाऱ्या कार्यवाहीची माहिती अपीलकर्त्यास नि:शुल्क द्यावी. याच्या पूर्ततेचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) श्री.प्रकाश परब यांनी दि.१०.१२.२००७ पर्यंत आयोगाला सादर करावा.

(३) (तत्कालीन)जन माहिती अधिकारी श्री.टी.एन.सुपे यांनी विहित मुदतीत उत्तर दिले असल्यामुळे शास्ती नाही. मात्र अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांनी अपीलकर्त्यास देण्यात कसूर केल्याबद्दल त्यांना समज देण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे

पुणे
दि. २७.११.२००७

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.यशवंत सदाशिव काळाणे
सचीव, भैरवनाथ ग्रामदेवस्थान ट्रस्ट, धालेवाडी,
ता.पुरंदर, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हाधिकारी, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपजिल्हाधिकारी तथा विशेष भूमी संपादन
अधिकारी क्र.२३, दुसरा मजला, नवीन प्रशासकीय
इमारत, कौंसिल हॉलसमोर, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४७८ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.६.८.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.यशवंत सदाशिव काळाणे
सचीव, भैरवनाथ ग्रामदेवस्थान ट्रस्ट, धालेवाडी,
ता.पुरंदर, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हाधिकारी, पुणे
प्रतिनिधी श्री.गो.श्री.कळमकर, नायब तहसीलदार, पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा उपजिल्हाधिकारी तथा विशेष भूमीसंपादन
अधिकारी क्र.२३, दुसरा मजला, नवीन प्रशासकीय
इमारत, कौंसिल हॉलसमोर, पुणे-१
श्रीमती नयना गुरव बोंदार्डे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ७.१.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २४.१.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २४.२.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १२.४.२००६ |
| ८ | **मुळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>(१)मौजे धालेवाडी येथील भैरवनाथ ग्रामदेवस्थान ट्रस्टच्या अंतर्गत जी मंदिरे नाझरे प्रकल्पामध्ये बुडीत झालेली आहेत, त्यांची नुकसानभरपाई ट्रस्टला अद्यापही मिळालेली नाही. नुकसानभरपाई अदा करण्याबाबत सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालयाने दि.१२.८.२००५ राजी लेखी कळविले आहे.<br>(२)सदरच्या भरपाईची रक्कम देवस्थानचे नांवे ट्रेझरीमध्ये कोणत्या तारखेला व कोणत्या चलनाने भरणा केली आहे. | |

## विवेचन

मौजे धालेवाडी येथील भैरवनाथ ग्रामदेवस्थान ट्रस्टच्या अंतर्गत जी मंदिरे नाझरे प्रकल्पामध्ये बुडीत झाली, त्यांची नुकसानीभरपाई देण्याबाबत संबंधित कार्यालयाकडे केलेले विनंती अर्ज, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय; पुणे यांनी विशेष भूमी संपादन कार्यालय क्र.२३ यांना या संदर्भात पाठविलेले पत्र, या अनुषंगाने नुकसानभरपाई न मिळाल्याबाबत तक्रार करणारा व देवस्थानला दिलेल्या रकमांबाबत माहिती मागणारा अर्ज ट्रस्टचे सचीव, अपीलकर्ता श्री.य.स.काळाणे यांनी जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी, विशेष भूमी संपादन कार्यालय क्र.२३, दुसरा मजला, नवीन प्रशासकीय इमारत, पुणे यांच्याकडे केला होता. या गावचे भू-संपादन करणारे कार्यालय बंद झाले असून विशेष भू-संपादन क्र.१८ मध्ये वर्ग करण्यात आले आहे. विशेष भू-संपादन कार्यालय क्र.१८ यांचे कार्यालय सन १९९० मध्ये बंद करण्यात आले आहे, त्यांचे दप्तर विशेष भू-संपादन कार्यालय क्र.२३ या कार्यालयाकडे वर्ग करण्यात आले आहे. या कार्यालयातील कागदपत्रात उपरोक्त गावचे मुलकी अनामत रजिस्टर व त्या संबंधातील इतर कागदपत्रे आढळून येत नाहीत. या कागदपत्रांचा शोध घेण्याचे काम चालू असून ती उपलब्ध होताच नुकसानभरपाई

देण्याबाबतची पुढील कारवाई करण्यात येईल असे जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी, विशेष भू-संपादन कार्यालय क्र.२३ यांनी श्री.काळाणे यांना कळविले. संबंधित अभिलेख १५-२० वर्षे जतन करण्याचा शासकीय आदेश असतानाही ते आढळून येत नाहीत, याचा अर्थ मोघम माहिती देऊन ट्रस्टची दिशाभूल करण्याचा हेतू दिसतो, असा आक्षेप घेत, संबंधित फरकाची रक्कम व्याजासहित ट्रस्टला त्वरित मिळण्याची मागणी श्री.काळाणे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडे अपिलात केली. 'अपिलार्थी यांना पाहिजे असलेली माहितीची संचिका आढळ होत नाही. तथापी अर्जदार यांना त्यांचे संपादनाचे पैसे देणे आवश्यक आहे. तरी विशेष भूमी संपादन अधिकारी यांनी सदरचे कागदपत्रांचा पूर्ण शोध घेऊन कागदपत्रे व अनामत रजिस्टर शोधून काढावीत , तसेच वरिष्ठ कोषागार अधिकारी, पुणे यांचेशी चर्चा करुन सदरील ट्रस्टला पैसे कसे अदा करता येतील याबाबतची माहिती घ्यावी व अर्जदार यांना पैसे अदा करणेबाबत योग्य ती कार्यवाही करावी,'असे नमूद करुन अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हाधिकारी, पुणे श्री.प्रभाकर देशमुख यांनी अपील निकाली काढले. तरीही तशी कार्यवाही न झाल्याचे नमूद करुन श्री.काळाणे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आपण दिलेल्या आदेशानुसार कार्यवाही झाली असून ट्रस्टला संबंधित रक्कम अदा करण्यात आली आहे, असे अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हाधिकारी, पुणे श्री.प्रभाकर देशमुख यांनी आयोगाला सादर केलेल्या लेखी निवेदनात नमूद केले आहे. आपण मागणी केल्यानुसार नुकसानभरपाई मिळाली व त्याबाबतचा सर्व तपशील मिळाल्यामुळे त्याबाबत आपली तक्रार राहिलेली नाही, असे श्री.काळाणे यांनी लेखी व तोंडी नमूद केले.

प्रकल्पातील बाधीत झालेल्या मंदिराबाबतची नुकसानभरपाई मिळावी अशी श्री.काळाणे यांची मुख्य मागणी होती. केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कक्षेत ती येत नाही. त्यातील कागदपत्रे उपलब्ध होत नव्हती. तरीही अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हाधिकारी, पुणे श्री.प्रभाकर देशमुख यांनी दखल घेऊन संबंधित कागदपत्रांचा पूर्ण शोध घेण्याची व संबंधित ट्रस्टला नुकसानभरपाई अदा करण्याची कार्यवाही केली, हे प्रशंसनीय आहे. आयोग त्याची आवर्जून नोंद घेत आहे.

आयोगाचा आदेश खालीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील अमान्य.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे

पुणे
दि. २२.११.२००७

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर,
पुणे ४११ ००१

श्री.दशरथ गेनभाऊ शेवकरी
रा.मु.पो.चाकण, ता.खेड, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे — उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,
जुन्नर उपविभाग, राजगुरुनगर, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४८९ + ३३१ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३०.६.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.दशरथ गेनभाऊ शेवकरी
रा.मु.पो.चाकण, ता.खेड, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे
श्री.प्रभाकर देशमुख

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय अधिकारी,
जुन्नर उपविभाग, खेड, पुणे
श्री.गजानन पाटील

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १३.३.२००६ (अपील क्र.४८९)<br>दि.२०.५.२००६ (अपील क्र.३३१) |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २३.३.२००६(अपील क्र.४८९)<br>दि.१२.६.२००६ (अपील क्र.३३१) |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १५.४.२००६(अपील क्र.४८९)<br>दि.१९.६.२००६ (अपील क्र.३३१) |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १८.५.२००६(अपील क्र.४८९)<br>दि.१८.७.२००६ (अपील क्र.३३१) |
| ८ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती<br><br>**<u>अपील क्र.४८९/पुणे</u>**<br><br>मौजे चाकण, ता.खेड, जि.पुणे येथील जमीन गट क्र.१७०५ व १७०६ चे नियमबाह्य व बेकायदेशीर अकृषिक वापराबाबत उपविभागीय अधिकारी, खेड, जि.पुणे यांचे आदेश क्र.सजल/कावि/युएनएसआर/१५०/२०००, दि.३०.६.२००१ व माझे दि.२९.१२.२००५ रोजी केलेला तक्रार अर्ज व दि.१३.२.२००६ रोजी केलेल्या स्मरणपत्राच्या अनुषंगाने चौकशी अहवाल व सदर चौकशी अहवालाच्या अनुषंगाने संबंधितांवर नियमानुसार केलेल्या कारवाईचा सविस्तर तपशील.<br><br>**<u>अपील क्र.३३१/पुणे</u>**<br><br>मौजे चाकण, ता.खेड, जि.पुणे येथील जमीन गट क्र.१७०५ ला तहसीलदारांच्या दिलेल्या निवासी अकृषिक परवानगीचा तपशील व सदर निवासी अकृषिक परवानगी रद्द केल्याच्या आदेशाची प्रत. | |

## <u>विवेचन</u>

मौजे चाकण, ता.खेड, जि.पुणे येथील जमीन गट क्र.१७०५ ला उपविभागीय अधिकारी, राजगुरुनगर, पुणे यांच्या आदेशा अन्वये देण्यात आलेल्या निवासी अकृषिक प्रयोजनाच्या मोजणी

नकाशासहित तपशील व तहसीलदार, खेड यांच्या आदेशा अन्वये निवासी अकृषिक परवानगी रद्द केल्याचा तपशील अशी माहिती अपीलकर्ता श्री.दशरथ गेनभाऊ शेवकरी यांनी जन माहिती अधिकारी तथा शिरस्तेदार, उपविभागीय अधिकारी कार्यालय जुन्नर उपविभाग, खेड , पूणे यांचेकडे मागितली होती. बांधकाम परवानगीच्या आदेशाची सहीशिक्क्याची प्रत नक्कल शुल्क रु.२०/- भरुन घेऊन जावी, सबंधित संचिकेमध्ये मोजणी नकाशा नसल्याने देता येत नाही व तहसीलदार, खेड यांचेकडील संचिका अभिलेख कक्षात आढळ होत नसल्याचे त्यांनी कळविल्यामुळे देता येत नाही, असे उपविभागीय अधिकारी, जुन्नर उपविभाग, खेड, पुणे यांनी त्यांना कळविले. त्याविरुध्द श्री.शेवकरी यांनी अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे अपील केले.

‘ बिगरशेती आदेशाची प्रत उपविभागीय अधिकारी, जुन्नर उपविभाग, खेड यांनी देता येईल असे कळविलेले आहे. मोजणी नकाशा हा संचिकेत नसलेमुळे देता येत नाही असे कळविलेले आहे. तरी अर्जदार यांना समक्ष सुनावणीत मोजणी नकाशाचे काम हे तालुका निरिक्षक भूमी अभिलेख यांचेकडे चालत असलेने त्यांचेकडून घेणेस सांगितले आहे. ही बाब अपिलार्थी यांनी मान्य केली आहे. बिगरशेती आदेशातील शर्तीचा भंग झाला किंवा कसे? याबाबतची कार्यवाही स्वतंत्र कार्यवाही असून ती माहितीचे अधिकारात येत नाही. माहितीचे अधिकारात माहिती देणे एवढेच अभिप्रेत आहे. तसेच तहसीलदार, खेड यांचेकडील संचिका गहाळ झालेबाबतचा भागही स्वतंत्र कार्यवाहीचा आहे. वरील सर्व कारणांमुळे अपिलार्थी यांच्या अपिलात तथ्य नसलेचे निदर्शनास आलेमुळे सदरील अपील फेटाळणेशिवाय पर्याय रहात नाही,’ असे नमूद करुन अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हाधिकारी, पुणे श्री.प्रभाकर देशमुख यांनी श्री.शेवकरी यांचे अपील फेटाळले. त्याविरुध्द श्री.शेवकरी यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे. (अपील क्र.३३१)

श्री.किसन/चंद्रकांत सोपान गोरे यांना दिलेली निवासी बिनशेती परवानगी रद्द करुन याबाबत अंतिम निर्णय होईपर्यंत गट क्र.१७०५ चा वापर कोणत्याही कारणासाठी करु नये असा आदेश तहसीलदार, खेड यांनी दि.११.११.१९९९ रोजी दिला होता. ती नस्ती अभिलेखात उपलबध नसल्याचे श्री.शेवकरी यांना कळविण्यात आलेले आहे. याच विषयासंदर्भात श्री.शेवकरी यांनी अन्य अपील आयोगाकडे केले आहे. उपविभागीय अधिकारी, जुन्नर उपविभाग, खेड यांचे उपरोक्त आदेश व त्या

अनुषंगाने आपण दि.२९.१२.२००५ रोजी केलेला तक्रार अर्ज, दि.१३.२.२००६ रोजी पाठविलेले स्मरणपत्र या संबंधातील चौकशी अहवाल व त्या अहवालानुसार संबंधितांवर केलेली कारवाई याची माहिती श्री.शेवकरी यांनी जन माहिती अधिकारी तथा चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांचेकडे मागितली होती. ही चौकशी अद्याप चालू असल्यामुळे अहवाल देता येत नाही असे जन माहिती अधिकाऱ्यांनी श्री.शेवकरी यांना कळविले. तसेच त्याच मुद्यावर अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, पुणे यांनी श्री.शेवकरी यांचे अपील फेटाळले.

मौजे चाकण, ता.खेड, जि.पुणे येथील गट क्र.१७०५ व १७०६ मध्ये सन १९९८ पासून नियमबाह्य व अनधिकृत अकृषिक वापर चालू असून गट क्र.१७०६ मध्ये बेकायदेशीरपणे इमारत बांधण्यात आली असून त्यामुळे आपले प्रचंड नुकसान झाले आहे व महसूल विभागातील संबंधित अधिकारी, कर्मचारी त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहेत. त्याबद्दल त्यांचेवर कारवाई व्हावी, अशी आपली मुख्य मागणी असल्याचे श्री.शेवकरी यांनी आयोगापुढील सुनावणीत लेखी व तोंडी नमूद केले. या अनुषंगाने आपल्याला मागितलेली माहिती दिली जात नसल्याची त्यांची तक्रार आहे. परंतु बिगरशेती आदेशातील शर्तीचा भंग झाला किंवा कसे हा माहितीच्या अधिकार कक्षेतील विषय नाही, तो स्वतंत्र कार्यवाहीचा विषय आहे, असे दोन्ही अपिलांमधील अपिलीय प्राधिकाऱ्यांनी नमूद केले आहे, ते रास्त आहे. मात्र श्री.शेवकरी यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये मागितलेली माहिती त्यांना मिळणे हा त्यांचा हक्क आहे.

उपविभागीय अधिकारी, जुन्नर उपविभाग, खेड यांनी आदेश क्र.सजल/०/१६०४/८५, दि.९.१.१९८६ अन्वये निवासी प्रयोजनार्थ परवानगी दिली आहे. या निकालाची प्रत नक्कल शुल्क रु.२०/- भरुन घेऊन जाण्याविषयी कळविले आहे. मोजणी नकाशा तालुका निरिक्षक भूमी अभिलेख यांच्याकडून घेण्याबाबत कळविले आहे व तहसीलदार, खेड यांचेकडील आदेश क्र.तखह/१९५३/९९, दि.११.११.१९९९ ची संचिका तहसीलदार, खेड यांचेकडे मागणी केली असता अभिलेखात आढळ होत नसलेबाबत तहसीलदार, खेड यांनी दि.६.६.२००६ रोजी माहिती अधिकारी यांना कळविले आहे व माहिती अधिकारी यांनी मागणी केलेली माहिती देता येत नसलेचे श्री.शेवकरी यांना कळविले आहे. अपिलार्थी यांना माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, जुन्नर उपविभाग, खेड यांनी

पाहिजे असलेली सर्व माहिती दिलेली आहे. माहितीचे अधिकाराखाली प्रकरणात उपलब्ध असलेली माहिती देणे अभिप्रेत आहे. बिनशेती आदेशातील शर्तीचा भंग झाला किंवा कसे हा कार्यवाहीचा स्वतंत्र भाग असून त्याकरिता अर्जदाराने योग्य त्या सक्षम अधिकाऱ्याकडे अर्ज देणे आवश्यक आहे. त्यामध्ये चौकशी होऊन चौकशीत निष्पन्न झालेस त्याप्रमाणे महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ प्रमाणे कार्यवाही केली जाईल, तसेच ज्या कर्मचाऱ्याने संचिका गहाळ केली हे चौकशीत निदर्शनास आलेस संबंधित कर्मचाऱ्याविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) १९७९ खाली स्वतंत्र कारवाई करण्यात येईल. तथापी त्याबाबत अर्जदाराने स्वतंत्र अर्ज देणे आवश्यक आहे ', असे अपिलीय प्राधिकारी श्री.प्रभाकर देशमुख यांनी आयोगाला सादर केलेल्या लेखी निवेदनात नमूद केले आहे.

अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या मूळ आदेशातील अभिप्रायानुसार आपण दि.१.९.२००६ रोजी उपविभागीय अधिकारी, जुन्नर उपविभाग, खेड व जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडे तक्रार अर्ज दिला व दि.१.१०.२००६ रोजी स्मरणपत्र पाठविले. परंतु त्यावरील कार्यवाहीचा अहवाल आपल्याला मिळाला नाही. तसेच तहसीलदार, खेड यांचेकडील गहाळ झालेल्या नस्तीचा तपशील व गट क्र.१७०५/१७०६ मधील नियमबाह्य बेकायदेशीर वाणिज्य वापर व अनाधिकृत बांधकाम याबाबतची माहिती आपल्याला देण्याचा आदेश जिल्हाधिकारी, पुणे यांनी दि.२६.१०.२००६ रोजी दिला होता, त्याची पूर्तताही उपविभागीय अधिकारी, जुन्नर उपविभाग, खेड यांनी केली नाही. त्यानंतर आपण महसूल राज्यमंत्र्यांकडे तक्रार अर्ज केला. त्यांनी चौकशी करुन अहवाल सादर करण्याबाबत दि.६.११.२००६ रोजी जिल्हाधिकारी यांना सूचित केले. जिल्हाधिकाऱ्यांनी उपविभागीय अधिकारी, जुन्नर उपविभाग, खेड यांचेकडून अहवाल मागविला होता. परंतु दि.२७.४.२००७ रोजी जिल्हाधिकाऱ्यांनी निर्णय पारित केला, तोपर्यंत उपविभागीय अधिकारी, जुन्नर उपविभाग, खेड यांनी अहवाल पाठविलेला नसल्याचे स्पष्ट झाले, असे श्री.शेवकरी यांनी आयोगाला सादर केलेल्या निवेदनात नमूद केले आहे.

'श्री.दशरथ गेनभाऊ शेवकरी यांनी दि.१५.१.२००७ रोजी या कार्यालयाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये अर्ज करुन मौजे चाकण, ता.खेड, जि.पुणे येथील गट क्र.१७०५चे बिगरशेती आदेश रद्द केल्याबाबतची मूळ संचिका गायब केल्याबाबत स्वतंत्र कार्यवाही

करुन चौकशी करणेबाबत मा.महसूल राज्य मंत्रीमहोदय यांनी जिल्हाधिकारी पुणे यांना पाठविलेले पत्र क्र.रा.म./महसूल/जनरल/२२४०/०६, दि.६.११.२००६ वर नियमानुसार केलेली कार्यवाही, संबंधितांवर केलेली कार्यवाही व सदर पत्राच्या अनुषंगाने चौकशी करुन अहवाल सादर करणेच्या सूचना उपविभागीय अधिकारी, जुन्नर उपविभाग, खेड यांस दिलेल्या आहेत. त्यानुसार त्यांचेकडून प्रकरणी चौकशीचे कामकाज सुरु असून अद्याप अहवाल प्राप्त झालेला नाही. त्यामुळे अंतिम अहवाल अद्याप मा.मंत्रीमहोदयांना सादर करण्यात आलेला नाही. या परिस्थितीमध्ये अर्जदार यांनी माहिती अधिकारान्वये मागणी केलेनुसार अहवालाची प्रत देता येत नसलेने त्यांस तसे दि.५.२.२००७ रोजी कळविणेत आले आहे. सदर निर्णयाविरुध्द त्यांनी अपिलीय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे दि.१५.३.२००७ रोजी दाखल केलेले अपीलही याच मुद्यावर फेटाळण्यात आले आहे,' असे जन माहिती अधिकारी तथा चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांनी आयोगाला सादर केलेल्या निवेदनात नमूद केले आहे. अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, पुणे यांनी आयोगाला सादर केलेल्या लेखी निवेदनात म्हटले आहे की, 'चौकशी करुन अहवाल सादर करण्याच्या सूचना उपविभागीय अधिकारी, जुन्नर उपविभाग, खेड यांस दिलेल्या आहेत. त्यानुसार त्यांचेकडून प्रकरणी चौकशीचे कामकाज सुरु असून अद्याप अहवाल प्राप्त झालेला नाही. त्यामुळे अंतिम अहवाल अद्याप मा.मंत्रीमहोदयांना सादर करण्यात आलेला नाही. या परिस्थितीमध्ये अर्जदार यांनी माहिती अधिकारान्वये मागणी केलेनुसार अहवालाची प्रत देता येत नसलेने त्यांस तसे दि.५.२.२००७ रोजी कळविणेत आले आहे. सदर निर्णयाविरुध्द त्यांनी दि.१५.३.२००७ रोजी अपील दाखल केले होते. त्यावर वेळोवेळी सुनावणी घेणेत आली तसेच सुनावणीचे दरम्यान उपविभागीय अधिकारी, जुन्नर उपविभाग, खेड यांस स्मरणपत्र देणेत आले, तसेच दूरध्वनीव्दारे पाठपुरावा करण्यात आला, परंतु अपील निर्गत करावयाच्या मुदतीमध्ये सदर खुलासा प्राप्त न झालेने अपिलार्थी यांचे अपील फेटाळण्यात आले'.

उभय बाजूंची लेखी व तोंडी निवेदने आणि सादर करण्यात आलेली कागदपत्रे लक्षात घेता पुढील बाबी स्पष्ट होतात :-

(१) बिगरशेती परवानगीच्या शर्तीचा भंग झाला किंवा कसे व तो झाला असल्यास त्याबाबत कारवाई करावी, ही श्री.शेवकरी यांची मागणी केंद्रिय माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही. मात्र हा त्यांचा मुख्य विषय असला तरी त्यांनी माहितीच्या अधिकारात मागणी केलेली, उपविभागीय अधिकारी यांच्या निवासी प्रयोजन परवानगीच्या आदेशाव्यतिरिक्तची माहिती त्यांना देण्यात आली नाही.

(२) मोजणी नकाशा बिगरशेती प्रकरणात नसला तरी तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांच्याकडून मागवून घेण्याचे मार्गदर्शन करण्याऐवजी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतूदीनुसार या मुद्यासाठी संबंधित अर्ज जन माहिती अधिकाऱ्यांनी तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांच्या कार्यालयाकडे पाठविणे आवश्यक होते ते त्यांनी केलेले नाही.

(३) तहसीलदार, खेड यांचेकडील आदेश क्र.तखह/१९५३/९९, दि.११.११.१९९९ ची मूळ संचिका अभिलेख कक्षात आढळ होत नसल्याचे श्री.शेवकरी यांना कळविण्यात आले आहे. महसूल विभागातील अधिकाऱ्यांनी संगनमताने ही संचिका गहाळ केली असल्याचा आरोप श्री.शेवकरी यांनी सातत्याने केला आहे. असे काही झाले आहे किंवा कसे, हा केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेतील विषय नाही मात्र संबंधित नस्ती व त्यातील आवश्यक माहिती श्री.शेवकरी यांना मिळणे आवश्यक आहे.

(४) अकृषिक वापराबद्दल संबंधित जमीन मालकाला दंड आकारण्यात आला असल्याचे जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, जुन्नर उपविभाग, खेड श्री.गजानन पाटील यांनी सांगितले, याबाबतचा आदेश आपल्याला मिळाला नसल्याचे श्री.शेवकरी यांनी स्पष्ट केले. दंड आकारणीच्या या आदेशाची प्रत श्री.गजानन पाटील यांनी श्री.शेवकरी यांना त्वरित द्यावी, असा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला.

(५) 'जमीन मालकाने अनधिकृत अकृषिक वापराबाबतची दंडाची रक्कम भरल्यानंतर अनधिकृत अकृषिक वापर हा म.ज.म.अ.१९६६ चे कलम ४७(ब) प्रमाणे नियमित करण्यात आल्याचे समजता कामा नये. परंतु जमीन मालकाची तशी इच्छा असल्यास महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४७ प्रमाणे अनधिकृत अकृषिक वापर हा नियमित करुन घेण्याकरिता रितसर मोजणी नकाशाच्या ४ प्रति व इतर कागदपत्रांसहित रितसर अर्ज करुन, संबंधित आदेश मिळाल्यापासून सहा महिन्याच्या आंत लेखी विनंती केली पाहिजे. याप्रमाणे जमीन मालकाने कसूर केल्यास म.ज.म.अ.९६६ व त्याखालील नियमाच्या तरतुदीनुसार अनधिकृत अकृषिक वापर बंद करणे व बांधकाम काढून टाकण्यात येईल, असे स्पष्टपणे नमूद केलेले आहे,' असे श्री.शेवकरी यांनी दि.१४.८.२००७ रोजी आयोगाला सादर केलेल्या निवेदनात कळविले आहे. त्यांनी जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, जुन्नर उपविभाग, खेड यांच्याकडे दि.३.७.२००७ रोजी याबाबत अर्ज केला. संबंधित जमीन मालकाने सदरचा वापर नियमित करुन घेण्याकरिता कोणत्याही प्रकारची कागदपत्रे अथवा अर्ज आपल्या कार्यालयाकडे दाखल केला नसलयाचे जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, जुन्नर उपविभाग, खेड यांनी या अर्जाच्या उत्तरात म्हटले आहे. म्हणजेच आयोगापुढील सुनावणीत उपविभागीय अधिकारी, जुन्नर उपविभाग, खेड यांनी खोटी व दिशाभूल करणारी माहिती दिली, असा दावा श्री.शेवकरी यांनी दि.१४.८.२००७ च्या निवेदनात केला आहे.

वरील बाबी लक्षात घेऊन आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

## आदेश

(१) अपील मान्य.

(२) बिगर अकृषिक वापरासंबंधी दंड आकारणी करुन वापर नियमित करण्यासंबंधातील माहितीबाबतचा नेमका तपशील जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, जुन्नर उपविभाग, खेड श्री.गजानन पाटील यांनी दि.५.१२.२००७ पर्यंत

आयोगाला सादर करावा. त्याविषयी आधी दिलेल्या माहितीत तफावत असल्यास त्याचे स्पष्टीकरण द्यावे.

(३) वरील विवेचनात नमूद केलेल्या गहाळ झालेल्या नस्तीचा शोध घेण्यासाठी एक महिन्याची मुदत आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिली होती. ती वाढवून देण्यात येत आहे. दि.१५.१२.२००७ पर्यंत या नस्तीतील अपीलकर्त्याला आवश्यक असलेली माहिती द्यावी, नस्ती उपलब्ध न झाल्यास ही नस्ती ज्यांच्या अधिकारकक्षेत येते अशा संबंधित अधिकारी / कर्मचारी यांच्याविरुध्द फौजदारी गुन्हा नोंदवावा. अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हाधिकारी, पुणे यांची ही जबाबदारी राहील. याबाबतच्या पूर्ततेचा अहवाल जिल्हाधिकारी, पुणे यांनी दि.३०.१२.२००७ पर्यंत आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे**

**पुणे**
**दि. १४.११.२००७**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. सूर्यकांत बंडु सुणगार,
रा. १६/१३६८, डॉ. ढवळे हॉस्पिटलमागे,
इचलकरंजी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा सचीव,
आंतरभारती शिक्षण मंडळ, इचलकरंजी,
ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका,
आंतरभारती शिक्षण मंडळ, इचलकरंजी,
ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६३ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १३.७.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. सूर्यकांत बंडु सुणगार, रा. १६/१३६८, डॉ.ढवळे हॉस्पिटलमागे, इचलकरंजी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा आंतरभारती शिक्षण मंडळ, इचलकरंजी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर श्री. गणपतराव ना. फाटक

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २३.१.२००७ |

| | | |
|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २८.१.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ६.२.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १४.२.२००७ |

८. मूळ अर्जात मागणी केलेली माहिती

श्री. संजय बंडु सुणगार यांच्या शाळा सोडल्याच्या दाखल्याची सांक्षाकित प्रत

## विवेचन

आंतरभारती विद्यालय, इचलकरंजी या शाळेत सन १९८२ ते १९८५ या कालावधीत शिकलेल्या श्री. संजय बंडु सुणगार यांच्या शाळा सोडल्याच्या दाखल्याची सांक्षाकित प्रत, त्यांचे बंधू व अपीलकर्ता श्री. सूर्यकांत बंडु सुणगार यांनी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, आंतरभारती विद्यालय, इचलकरंजी यांच्याकडे मागितली होती. हा दाखला श्री. संजय बंडु सुणगार यांनी यापूर्वीच नेला असल्याचे जन माहिती अधिकाऱ्यांनी त्यांना कळविले. त्याविरुध्द श्री. सूर्यकांत बंडु सुणगार यांनी अपिलीय प्राधिकारी तथा सचीव, आंतरभारती विद्यालय, इचलकरंजी यांच्याकडे अपील केले. महाराष्ट्र शासकीय नियमावली १९८१ अन्वये संबंधित व्यक्तीने मागणी केल्यास त्या व्यक्तीलाच तसा दाखला देण्यात येतो, असे कळवून अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अपील अमान्य केले. त्याविरुध्द श्री. सुणगार यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आपल्या मुलाच्या जातीच्या दाखल्याकामी भावाच्या या दाखल्याची गरज आहे. ही तातडीची गरज असल्यामुळे ४८ तासात माहिती मिळावी, असे श्री. सुणगार यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलात म्हटले आहे. ४८ तासात माहिती देण्याची तरतूद या विषयाला लागू होत नाही.

आपण आपल्या भावाचाच दाखल मागत असल्याचे श्री. सुणगार यांनी म्हटले आहे. परंतु शाळा आचारसंहिता नियम २८ प्रमाणे शाळा सोडल्याचा दाखला ती व्यक्ती अथवा तिचे पालक यांनी मागणी केल्यास देण्याची तरतूद आहे. श्री. सूर्यकांत बंडु सुणगार हे श्री. संजय बंडु सुणगार यांचे पालक नाहीत, तसेच कौटुंबिक अंतर्गत वादामुळे आपला दाखला श्री. सूर्यकांत बंडु सुणगार यांना देऊ नये, असे श्री. संजय बंडु सुणगार यांनी कळविले आहे, असे चिटणीस आंतरभारती विद्यालय,

इचलकरंजी यांनी आयोगापुढील सुनावणीत लेखी व तोंडी नमूद केले. हा दाखला देण्यास आपले बंधू श्री. संजय बंडु सुणगार 'ना हरकत पत्र' देणार नाहीत, हे अपीलकर्त्याने मान्य केले. ही स्थिती लक्षात घेता दाखल्याची साक्षांकित प्रत अपीलकर्त्यास न देण्याचा जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय योग्य आहे. अपीलकर्त्याची मागणी 'दाखल्या'विषयीची असल्यामुळे ह्या विषयी दाद मागणे माहितीच्या अधिकाराच्या तरतुदीखाली येत नाही, असे संस्थेचे चिटणीस यांनी निवेदनात म्हटले आहे, ते योग्य नाही. आवश्यक कागदपत्रांची प्रत मागण्याचा नागरिकांचा हक्क माहितीच्या अधिकारात समाविष्ट आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

१. अपील अमान्य.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे**

**पुणे**
**दि. २०.११.२००७**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे १

श्री. जितेंद्र भानुशंकर मेहता,
प्लॉट क्र.३२०, फ्लॅट नं.२, सेक्टर क्र.२६,
महावीर कॉम्प्लेक्स, पिसीएनटीडी,
निगडी, पुणे- ४११ ०४४ — अपीलकर्ता

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पुणे

उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६३७ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ६.८.२००७ |

३. **उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. जितेंद्र भानुशंकर मेहता, प्लॉट नं.३२०, फ्लॅट नं.२, सेक्टर नं.२६, महावीर कॉम्प्लेक्स, पिसीएनटीडी, निगडी, पुणे- ४११ ०४४

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पुणे श्री. सा.मा.गायकवाड

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासन अधिकारी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पुणे श्री. तुकाराम विठोबा कांदलकर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३१.१०.२००६ |

| | | |
|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २३.११.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १०.१.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | **<u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती</u>**<br><br>पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क्षेत्रातील प्लॉट क्र. ३२०, फ्लॅट क्र.२, सेक्टर क्र. २६, महावीर कॉम्प्लेक्स, निगडी, पुणे या आपल्या मिळकतीसंबंधी विस्तृत माहिती | |

## विवेचन

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क्षेत्रातील प्लॉट क्र. ३२०, फ्लॅट क्र.२, सेक्टर क्र. २६, महावीर कॉम्प्लेक्स, निगडी, पुणे या आपल्या मिळकतीसंबंधी विस्तृत माहिती मागणारे अर्ज अपीलकर्ता श्री. जितेंद्र भानुशंकर मेहता यांनी जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पुणे यांच्याकडे केले होते. दि. ३०.२.२००६ व दि. ४.१२.२००६ रोजी केलेल्या या अर्जांमधील काही प्रश्नांची उत्तरवजा माहिती जन माहिती अधिकाऱ्यांनी दिली. परंतु त्याने समाधान न झाल्याने श्री. मेहता यांनी अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पुणे यांच्याकडे अपील केले. अपिलाची सुनावणी होऊनही निर्णय न मिळाल्यामुळे श्री. मेहता यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

सन २००२ साली पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने या मिळकतीसंबंधी मिळकत कराबाबत मूल्यांकन केले होते हे तुम्हास मान्य आहे काय, ही मालमत्ता अपीलकर्त्याने दि. १.४.११९९ रोजी खरेदी केली होती हे तुम्हास मान्य आहे काय, दि. २५.१२.१९९७ पासून दि. ४.१२.२००२ पर्यंत मिळकत करासाठी या मालमत्तेचे मूल्यांकन पिंपरी चिंचवड महापालिकेने केले नव्हते हे तुम्हाला मान्य आहे काय, मिळकतकराच्या मालमत्तेचे मूल्यांकन करण्याचे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे नियम काय आहेत, त्याची प्रत द्यावी, मिळकतकरात वाढ / घट करण्याची पध्दत आहे काय, अशा प्रश्नांच्या स्वरुपात बव्हंश माहिती विचारली असल्यामुळे व मतप्रदर्शन अपेक्षित असल्यामुळे त्याचे उत्तर देता येत नाही, असे जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पुणे

यांनी त्यांना कळविले. तसेच आपल्या मिळकतीविषयी कागदपत्रांच्या प्रती हव्या असल्यास किंवा समक्ष पाहणी करावयाची असल्यास ते उपलब्ध करुन देता येतील, असेही त्यांनी कळविले.

श्री. मेहता यांनी अशा प्रकारची माहिती मागितली असली तरी त्यांची मूळ मागणी मिळकतकर आकारणीबाबतची होती. ती वेगवेगळ्या अर्जाद्वारे ते मांडत राहिले. तो प्रश्न आता सोडविण्यात आला आहे, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगापुढील सुनावणीत सांगितले. श्री. मेहता यांनी ते मान्य केले. परंतु आपल्याला माहिती मिळणे आवश्यक होते, ती मिळालेली नाही, असे श्री. मेहता यांनी नमूद केले. केवळ प्रश्नांच्या स्वरुपात माहिती विचारली आहे, म्हणून ती देता येणार नाही, हा जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी लावलेला अन्वायार्थ चुकीचा आहे. 'स्पष्टीकरण अथवा खुलासेवजा माहिती' मागता येणार नाही. परंतु मिळकतकर आकारणीचे नियम काय आहेत, अथवा विशिष्ट कालावधीत मिळकतकराची आकारणी केली गेली की नाही, यासारख्या प्रश्नांबाबतची माहिती दिली गेली पाहिजे, ती दिली गेली नाही.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या अन्वायार्थ बाबतच्या पूर्ण प्रशिक्षणाअभावी काही माहिती द्यावयाची नाकारली गेली आहे, परंतु येत्या आठ दिवसात उर्वरित माहिती आपण अपीलकर्त्याला देऊ, असे जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पुणे श्री. तुकाराम विठोबा कांदलकर व अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका श्री. सा.मा.गायकवाड यांनी सांगितले.

आयोगाने सुनावणीच्या वेळी दिलेल्या आदेशाप्रमाणे जन माहिती अधिकाऱ्यांनी श्री. मेहता यांना देऊ केलेली माहिती समक्ष घेण्यास श्री. मेहता यांनी नकार दिल्यामुळे दि. ९.८.२००७ रोजी ही माहिती टपालाने पाठविल्याचे जन माहिती अधिकाऱ्यांनी आयोगाला कळविले. परंतु आपल्याला पूर्ण माहिती दिली गेलेली नाही, असे निवेदन श्री. मेहता यांनी दि. २१.८.२००७ रोजी आयोगाला पाठविले. याबाबतची वस्तुस्थिती जन माहिती अधिकाऱ्यांनी स्पष्ट केलेली नाही.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे यांचा विचार करुन आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

## आदेश

१. अपील अंशतः मान्य.

२. मिळकतकराच्या आकारणीबाबतची अपीलकर्त्याची मूळ मागणी आहे, ती केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही. या अधिनियमाच्या कक्षेच्या बाहेरील विषय अपीलकर्त्याने माहितीच्या मागणीचा अर्ज / अपिले याद्वारे मांडता कामा नये याची समज त्यांना देण्यात येत आहे.

३. मिळावयाची राहिलेल्या माहितीचा नेमका तपशील कोणत्याही भाष्याशिवाय अपीलकर्त्याने जन माहिती अधिकाऱ्यांना सादर करावा. त्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी त्वरित व निःशुल्क माहिती द्यावी. आयोगापुढे मान्य केल्यानुसार ऊर्वरित माहिती सुनावणीपासून चार दिवसात पूर्णपणे दिली किंवा नाही, दिली नसल्यास त्याची कारणे काय, याच्या स्पष्टीकरणासह जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पुणे यांनी दि. १०.१२.२००७ पर्यंत आयोगाला अहवाल सादर करावा.

पुणे
दि. २७.११.२००७

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.अंगद नरहरीराव भोसले
रा.व्दारा सदलापुरे, स.नं.५३/५८,
साईनाथनगर, वडगावशेरी, पुणे-१४ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**(१)अपिलीय प्राधिकारी** तथा प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, मुरुड, जि.लातूर — उत्तरवादी
**(२)अपिलीय प्राधिकारी** तथा सहसंचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे

**(१)जन माहिती अधिकारी** तथा प्राचार्य, दिलीप एकंबेकर अध्यापक विद्यालय, उदगीर, लातूर
**(२)जन माहिती अधिकारी** तथा उपसंचालक (प्रशिक्षण) महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८८+८९/ पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२.७.२००७ |
| ३ | **उपस्थित** | |

**अपीलकर्ता** श्री.अंगद नरहरीराव भोसले
रा.व्दारा सदलापुरे, स.नं.५३/५८,
साईनाथनगर, वडगावशेरी, पुणे-१४

**(१)अपिलीय प्राधिकारी** तथा प्राचार्य, जिल्हा शिक्षण व
प्रशिक्षण संस्था, मुरुड, जि.लातूर
श्री.बी.पी.शेख

| | | |
|---|---|---|
| **(२)अपिलीय प्राधिकारी** तथा सहसंचालक, महाराष्ट्र राज्य<br>शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे<br>श्री.आ.रा.काईंगडे<br><br>**(१)जन माहिती अधिकारी** तथा प्राचार्य, दिलीप एकंबेकर<br>अध्यापक विद्यालय, उदगीर, लातूर<br>**(२)जन माहिती अधिकारी** तथा उपसंचालक (प्रशिक्षण) महाराष्ट्र राज्य<br>शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे<br>श्री.एस.एन.पवार | | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २८.४.२००६(अ.क्र.८८)<br>दि.२८.४.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -<br>दि. - |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १४.६.२००६ (अ.क्र.८८)<br>दि.१४.६.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. - |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

कै.बापूसाहेब एकंबेकर फाऊंडेशन संचलित दिलीप एकंबेकर अध्यापक विद्यालय, उदगीर, जि.लातूर येथे सन २००२ ते २००५ पर्यंत प्रवेश देण्यात आलेल्या विद्यार्थ्यांची यादी, त्यांनी जोडलेल्या रहिवासी प्रमाणपत्राची नक्कल, कॉलेजच्या दाखल्याच्या नकला, अवैध विद्यार्थ्यांवर कारवाई केली असेल तर नावे, इ.तपशील. संस्थेवर सरकारी कार्यालयाकडून कोणत्या प्रकारची कारवाई करण्यात आलेली आहे, नसेल तर का नाही?

## विवेचन

कै.बापूसाहेब एकंबेकर फौंडेशन संचलित दिलीप एकंबेकर अध्यापक विद्यालय, उदगीर, जि.लातूर येथे सन २००२ ते २००५ पर्यंत प्रवेश देण्यात आलेल्या विद्यार्थ्यांची नावे, प्रवेशाच्या वेळी त्यांनी जोडलेल्या रहिवासी प्रमाणपत्राची प्रत, महाविद्यालयाने दिलेल्या दाखल्याच्या

प्रमाणपत्राच्या सत्यप्रती, हे सर्व प्रवेश नियमानुसार केले आहेत काय, अवैध विद्यार्थ्यांवर कारवाई केली काय, केली असल्यास विद्यार्थ्यांची नावे व कारवाईचा तपशील, अवैध विद्यार्थ्यांना प्रवेश दिल्यामुळे संस्थेवर कारवाई झाली असल्यास त्याची माहिती, नसल्यास का केली नाही अशी माहिती अपीलकर्ता श्री.अंगद नरहरीराव भोसले यांनी जन माहिती अधिकारी, तथा उपसंचालक (प्रशिक्षण) महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांच्याकडे मागितली होती.

जन माहिती अधिकाऱ्यांच्या उत्तराने समाधान न झाल्याने व प्रथम अपिलात माहिती न मिळाल्यामुळे श्री.भोसले यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपिल दाखल केले आहे. (अपील क्र.८९)

जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, दिलीप एकंबेकर अध्यापक विद्यालय, उदगीर, लातूर यांच्याकडे श्री.भोसले यांनी अर्ज केल्यानंतर रु.१०,०००/- शुल्क भरावे, असे जन माहिती अधिकारी श्री.सु.ग.सूर्यवंशी यांनी त्यांना कळविले. श्री.भोसले यांनी हे शुल्क भरले नाही. विहित मुदतीत उत्तर न आल्यामुळे श्री.भोसले यांनी अपिलीय प्राधिकारी म्हणून प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, मुरुड यांच्याकडे अपील केले. परंतु श्री.भोसले यांनी अपिलीय प्राधिकारी म्हणून संस्थेचे सचीव यांच्याकडे अपील करणे आवश्यक होते, तसे त्यांना कळवून प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, मुरुड यांनी जन माहिती अधिकाऱ्यांना माहिती देण्याबाबत कळविले. तरीही आपल्याला माहिती मिळाली नाही असे नमूद करुन श्री.भोसले यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे. (अपील क्र.८८)

महाविद्यालयाकडून माहिती मिळत नसल्यामुळे श्री.भोसले यांनी जन माहिती अधिकारी तथा उपसंचालक (प्रशिक्षण) महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण, परिषद, पुणे यांच्याकडे माहिती मागणारा अर्ज केला, परंतु महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण, परिषद, पुणे यांच्याकडे ही माहिती उपलब्ध नसते. ती संबंधित अध्यापक विद्यालयाकडून मागविली असून प्राप्त होताच पाठविण्यात येईल, असे श्री.भोसले यांना जन माहिती अधिकारी यांनी कळविले. त्याच बरोबर संबंधित महाविद्यालयाला प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण

संस्था, मुरुड, जि.लातूर यांना, विभागीय उपशिक्षण संचालक, लातूर विभाग लातूर यांनीही वेळोवेळी कळविले. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी खूप प्रयत्न करुनही प्राधिकाऱ्यांनी कळविल्याप्रमाणे रु.१०,०००/- शुल्क श्री.भोसले यांनी न भरल्याने संबंधित माहिती त्यांना उपलब्ध करुन देता आली नाही, असे जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगाला सादर केलेल्या लेखी निवेदनात म्हटले आहे.

अपीलकर्ता श्री.भोसले हे स्वामी समर्थ अध्यापक विद्यालय, जि.सिंधुदुर्ग या विद्यालयाशी संबंधित आहेत. सन २००१ पर्यंत हे अध्यापक विद्यालय अनधिकृत होते. त्यांनी विनापरवानगी १०० विद्यार्थ्यांना नियमबाह्य प्रवेश दिले होते. त्यातील सर्व विद्यार्थ्यांना परीक्षेस बसू द्यावे ही नियमबाह्य मागणी करणारे श्री.भोसले हे आहेत. आपली अवैध मागणी पूर्ण करुन घेण्यासाठी व अधिकाऱ्यांवर दडपण आणण्यासाठी श्री.भोसले हे माहितीच्या अधिकाराचा दुरुपयोग करीत आहेत, असे जन माहिती अधिकारी तथा उपसंचालक श्री.आ.रा.काईंगडे व प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहसंचालक श्री.एस.एन.पवार यांनी आयोगापुढील सुनावणीत लेखी व तोंडी निवेदनात नमूद केले. श्री.भोसले यांनी याचा इन्कार केला व अन्याय झालेल्या विद्यार्थ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी आपण प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले.

अपिलीय प्राधिकारी बदललेले असूनही योग्य अधिकाऱ्याकडे श्री.भोसले यांनी अपील केलेले नव्हते तरीही दखल घेऊन प्राचार्यांशी व अन्य अधिकाऱ्यांशी पत्रव्यवहार केला. रु.१०,०००/- शुल्क भरण्याबाबत श्री.भोसले यांना वारंवार कळविले, असे प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था मुरुड श्री.बी.पी.शेख यांनी स्पष्ट केले, परंतु आपल्याला अशा प्रकारचे एकही पत्र मिळाले नसल्याचे श्री.भोसले यांनी सांगितले. या सर्व संदभात होणाऱ्या पत्रव्यवहाराची व केल्या जाणाऱ्या कार्यवाहीची कल्पना वेळोवेळी श्री.भोसले यांना दिल्याचे उपसंचालक (प्रशिक्षण) श्री.आ.रा.काईंगडे व सहसंचालक श्री.एस.एन.पवार यांनी नमूद केले.

संबंधित महाविद्यालय व महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांच्याकडे श्री.भोसले हे अनेक प्रकारचे अर्ज सातत्याने करीत असल्याचे सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसते. या अर्जांची दखल घेऊन त्या त्या वेळी केलेल्या कार्यवाहीचा तपशील श्री.काईंगडे व श्री.पवार यांनी सादर केला. प्राचार्य श्री.शेख यांनीही अनुषंगिक कागदपत्रे सादर केली. कार्यवाहीबाबतची व पत्रव्यवहाराची कल्पना आपल्याला वेळोवेळी देण्यात आल्याचे श्री.भोसले यांनी मान्य केले.

उभय बाजूंच्या निवेदनाचा तपशीलवार विचार करता आयोगाने महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांच्या संचालकांनी एकंबेकर महाविद्यालयाचे प्राधिकारी व सचीव / अध्यक्ष यांना बोलावून घेऊन माहिती मागणीच्या अर्जाच्या अनुषंगाने संबंधित सर्व मुद्यांची चर्चा करावी, त्यांना कारवाईची जाणीव द्यावी, रु.१०,०००/- शुल्क कोणत्या आधारे कळविले त्याचे स्पष्टीकरण घ्यावे व आयोगाला याबाबतचा अहवाल दि.१२.८.२००७ पर्यंत सादर करावा, असे आदेश आयोगाने सर्व संबंधितांची निवेदने व कागदपत्रे विचारात घेऊन दिला. दि.२०.८.२००७ पर्यंत श्री.भोसले यांनी महिती बाबत खुलासा न झाल्यास साध्या अर्जाव्दारे आयोगाला कळवावे, त्यावर विचार करुन आयोग पुढील निर्णय घेईल, असेही आयोगाने त्यावेळी दिलेल्या तोंडी आदेशात नमूद केले होते. त्यानुसार दि.२४.७.२००७ रोजी प्राचार्य, दिलीप एकंबेकर अध्यापक विद्यालय व संस्थेचे सचीव यांना तसेच विभागीय शिक्षण उपसंचालक, लातूर, अधिव्याख्याता; जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था; मुरुड यांना बोलावून घेऊन सुनावणी करण्यात आल्याचा अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा सहसंचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संस्था व प्रशिक्षण परिषद, पुणे श्री.एस.एन.पवार यांनी आयोगाला दि.१.८.२००७ (प्राप्त दि.३.८.२००७) रोजी सादर केला त्यातील ठळक मुद्दे पुढीलप्रमाणे :

(१) अध्यापक विद्यालयाचे म्हणणे उचित असल्याचा अभिप्राय या निवेदनात नमूद केला आहे.

(२) श्री.भोसले यांना शुल्क भरण्याबाबत सात पत्रे प्राचार्यांनी पाठविली. श्री.भोसले यांनी ही रक्कम भरलेली नाही. त्यामुळे माहिती देता आली नाही. प्रवेश नियमानुसार झाला असल्याने अवैध प्रवेशाचा प्रश्नही नाही, रहिवासी प्रमाणपत्रे संस्थेच्या व अध्यापक विद्यालयाच्या दप्तरी नाहीत. ती रजिस्टर पोस्टाने मागवून घेण्यास प्रती विद्यार्थी ६७/- रु. खर्च आहे. श्री.भोसले यांनी शुल्क भरल्यास रहिवासी प्रमाणपत्रे मागवून घेता येतील. प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची यादी , दाखल्याची प्रत इ. माहिती सोबत आणली आहे.(२०८ पाने-२ प्रती). त्यासाठी संबंधित अध्यापक विद्यालयाला झेरॉक्स व गाडीखर्च मिळून २०७२/- रुपये मिळावेत असे प्राचार्य व सचीव यांनी प्रतिपादन केले आहे.

(३) प्राचार्य व सचीव यानी उपस्थित केलेल्या मुद्यांबाबतची माहिती वरिष्ठ कार्यालयास वेळीच कळविलेली नाही, अध्यापक विद्यालयास व संस्थेस त्याबाबत खुलासा विचारणाऱ्या, वरिष्ठ कार्यालयाच्या पत्रांची वेळीच दखल घेतली नाही याबद्दल संस्थेवर रु.५०००/- दंडात्मक कारवाई केली आहे.

वरील विवेचनावरुन पुढील निष्कर्ष निघतात :

(१) माहिती देण्यासाठी रु.१०,०००/- शुल्क कळवितानाच त्याबाबतचे स्पष्टीकरण जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकर्त्यास आधी द्यावयास हवे होते.

(२) अपीलकर्त्याने शुल्क भरुन माहिती घेणे अथवा ते अमान्य असल्यास त्या विषयी स्वतंत्र पत्रव्यवहार करणे आवश्यक होते. असे न करता केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ खाली अर्ज व अपील करतानाच प्रशासकीय वरिष्ठ कार्यालयांकडे तक्रार व अर्ज ते करीत राहिले. सर्व यंत्रणांवर अकारण ताण देणारी अशी ही कार्यपध्दती आहे.

(३) संबंधित संस्थेने केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ बाबत गांभीर्याची भूमिका घेतलेली नाही. माहिती देण्याच्या शुल्कात गाडीखर्चाचाही समावेश करण्याची मागणी हे त्याचेच निदर्शक आहे.

(४) महाराष्ट्र राज्य शैक्षणिक व संशोधन परिषदेच्या अधिकाऱ्यांनी माहिती मिळवून देण्याचा व त्यासाठी प्रशासकीय अधिकारातील कार्यवाहीचा तत्परतेने व गांभीर्याने प्रयत्न केला आहे, तो प्रशंसनीय आहे.

वैयक्तिक लाभासाठी व आपल्याला हवी असलेली प्रशासकीय व अन्य स्वरुपाची कामे करुन घेण्यासाठी दबावाचे साधन अशा स्वरुपात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चा वापर अपेक्षित नाही, तसेच असा वापर होत असल्याची सबब पुढे करुन माहिती नाकारण्याचे अथवा अपुरी, विलंबाने, चुकीची देणेही मान्य करता येणार नाही, याची जाणीव सर्व संबंधितांनी ठेवणे आवश्यक आहे.

आपल्याला माहिती न मिळाल्याचे श्री.भोसले यांनी आयोगाला दि.२१.८.२००७ रोजी पत्रान्वये कळविले. महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांच्याकडे झालेल्या सुनावणी नंतर संबंधित संस्थेकडून प्राप्त झालेली माहिती अहवालासोबत आयोगाकडे पाठविण्यात आली होती. श्री.भोसले यांना दि.१३.९.२००७ रोजी आयोगाच्या कार्यालयात समक्ष देण्यात आली.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशतः मान्य.

(२) माहितीच्या अधिकाराचे गांभीर्य राखण्याची व तंतोतंत पालन करण्याची उभय बाजूंची जबाबदारी आहे, याची समज उभय बाजूंना देण्यात येत आहे.

(३) कै.बापूसाहेब एकंबेकर फौंडेशन (संचलित दिलीप एकंबेकर अध्यापक विद्यालय) संस्थेला अपिलीय प्राधिकारी तथा सह-संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण

परिषद, पुणे यांनी लावलेली रु.५०००/- ची शास्ती राज्य माहिती आयोगाने केलेली कार्यवाही समजून तीस मान्यता देण्यात येत आहे.

(४) अपीलकर्त्यास माहितीची २०८ पाने नि:शुल्क देण्यात येत आहेत. उर्वरित माहिती आवश्यक असल्यास योग्य ते शुल्क भरुन प्राप्त करुन घ्यावी.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे

पुणे
दि. १७.११.२००७

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.आजीमोद्दीन शहाबुद्दीन मुल्ला
रा.९८७, कसबा मुल्ला गल्ली,
बार्शी, जि.सोलापूर

अपीलकर्ता

**विरुध्द**

(१)**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर

(२)**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१

(३)**अपिलीय प्राधिकारी** तथा सहायक धर्मादाय आयुक्त, सोलापूर

(१)**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, अँग्लो उर्दू हायस्कूल
व ज्युनिअर कॉलेज, बार्शी, जि.सोलापूर

(२)**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, अँग्लो उर्दू हायस्कूल
अक्कलकोट, जि.सोलापूर

(३)**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, अँग्लो उर्दू हायस्कूल
पंढरपूर, जि.सोलापूर

(४)**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक शिक्षण संचालक,
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग यांचे कार्यालय, पुणे -१

(५)**जन माहिती अधिकारी** तथा उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
कार्यालय, जिल्हा परिषद, सोलापूर

(६)**जन माहिती अधिकारी** तथा प्रभारी अधीक्षक, सार्वजनिक न्यास
नोंदणी कार्यालय, नाथ प्राईड, सिव्हिल हॉस्पिटलच्या पूर्वेस,
उत्तर सदर बझार, सोलापूर ४१३००३

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९२+९३+९४+९६+९७+९८+९९+१००+ १०१+ १०२+१०३+१०४+१०५+१०६+१०७+१०८/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.५.९.२००७ |

## ३. उपस्थित

**अपीलकर्ता** श्री.आजीमोद्दीन शहाबुद्दीन मुल्ला
रा.९८७, कसबा मुल्ला गल्ली,
बार्शी, जि.सोलापूर

(१)**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर श्री.एम.एन.वीर

(२)**अपिलीय प्राधिकारी** तथा सहायक धर्मादाय आयुक्त, सोलापूर
प्रतिनिधी श्री.डी.बी.पवार (वरिष्ठ लिपीक)

(१)**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, अँग्लो उर्दू हायस्कूल
व ज्युनिअर कॉलेज, बार्शी, जि.सोलापूर
श्री.जलालोद्दीन अब्दुलगनी कर्नूल

(२)**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, अँग्लो उर्दू हायस्कूल
अक्कलकोट, जि.सोलापूर श्री.बाशा घुडूभाई कोरबू

(३)**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, अँग्लो उर्दू हायस्कूल
पंढरपूर, जि.सोलापूर श्री.एस.एम.कुमठे

(४)**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक शिक्षण संचालक,
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग यांचे कार्यालय, पुणे ३१
श्री.वसंत मार्तंड गायकवाड

(५)**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक)
कार्यालय, जिल्हा परिषद, सोलापूर श्री.एस.के.सगरे

(६)**जन माहिती अधिकारी** तथा प्रभारी अधीक्षक, सार्वजनिक न्यास
नोंदणी कार्यालय, नाथ प्राईड, सिव्हिल हॉस्पिटलच्या पूर्वेस,
उत्तर सदर बझार, सोलापूर ४१३००३ श्री.के.बी.धावारे

| अपील क्रमांक | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय प्राधिका -ऱ्याने निर्णय दिल्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| ९२/सोलापूर | १४.१२.२००५ | २१.१२.२००५ | १७.१.२००६ | -- |
| ९३/सोलापूर | १४.१२.२००५ | २१.१२.२००५ | १७.१.२००६ | -- |
| ९४/सोलापूर | १९.१.२००६ | २१.१.२००६ | ८.२.२००६ | -- |
| ९८/सोलापूर | १४.१२.२००५ | २१.१२.२००५ | १७.१.२००६ | -- |
| ९९/सोलापूर | २६.१२.२००५ | ७.१.२००६ | १७.१.२००६ | -- |
| १००/सोलापूर | २६.१२.२००५ | ७.१.२००६ | १७.१.२००६ | -- |
| १०१/सोलापूर | १९.१२.२००५ | १०.१.२००६ | ३१.१.२००६ | -- |
| १०२/सोलापूर | १९.१२.२००५ | ९.१.२००६ | ३१.१.२००६ | -- |
| १०३+९७ /सोलापूर | ८.१२.२००५ | ६.१.२००६ | ६.२.२००६ | -- |
| ९६/ सोलापूर | १७.१.२००६ | -- | १६.३.२००६ | -- |
| १०४/सोलापूर | १८.१.२००६ | -- | १७.३.२००६ | -- |
| १०५/सोलापूर | १७.१.२००६ | -- | १७.३.२००६ | -- |
| १०६/सोलापूर | ३१.१.२००६ | -- | १७.३.२००६ | |
| १०७/सोलापूर | १७.१.२००६ | -- | १७.३.२००६ | -- |
| १०८/सोलापूर | १८.१.२००६ | -- | ९.३.२००६ | -- |

८

**मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

**अपील क्र.९२/सोलापूर**

अंजुमने तरगीबे तआलीम, अक्कलकोट या संस्थेवर सह धर्मादाय आयुक्त, औरंगाबाद यांच्याकडून आर्थिक व्यवहार, बँक खाते, शिक्षण सेवकांची मुलाखत व भरती या सर्व बाबीवर मनाई हुकूम आहे, हे आपणास माहिती आहे का? मनाई असताना या सर्व गोष्टी कोणत्या आधारे करता येतात? श्री.गोलंदाज इमरान व काजी व इतर कर्मचाऱ्यांना खोटे दस्तऐवज तयार करुन शिक्षण उपसंचालक, पुणे यांची दिशाभूल करुन मान्यता घेतली ही शासनाची फसवणूक नाही का?

**अपील क्र.९३+१००/सोलापूर**

बार्शी येथील प्रशालेत सेवेत असताना मला पदोन्नती देण्याचा ठराव संस्थेने केला होता त्याची नक्कल, माझे कालबध्द पदोन्नतीच्या ठराव सेवापुस्तकात खाडाखोड केली आहे, त्याकामी केलेल्या ठरावाची नक्कल, माझे सेवापुस्तकात खोट्या नोंदी करण्यात आल्या आहेत त्याची नक्कल, बार्शी प्रशालेतील शालेय समितीचे अध्यक्ष व इतर पदाधिकाऱ्यांची सन १९९९ ते आजतागायत नांव व पत्ते, वरील ठरावाव्यवतिरिक्त केलेल्या ठरावांच्या नकला.

## अपील क्र.९४/सोलापूर

अंजुमने तरगीबे तआलीम, अक्कलकोट प्रशालेत कार्यरत असलेल्या सर्व कर्मचाऱ्यांची नाव, पद, शैक्षणिक अर्हता इ.माहिती. श्री.व्ही.व्ही.पिरजादे यांना नियुक्ती दिलेल्या आदेशाची प्रत, इतर माहिती अपील क्र.९२ प्रमाणे.

## अपील क्र.९८/सोलापूर

माझे बदलीसंदर्भातील ठरावाची नक्कल, बदलीचा आदेश घेतल्याची टपाल बुकवर सही घेतली त्याची प्रत, संस्थेच्या विश्वस्तांच्या अधिकृतपणाबद्दलचा पुरावा, श्री.एम.एम.शेख यांना कोणत्या आधारे रुजू करुन घेतले, माझी रजा विनापगारी केली त्या ठरावाची नक्कल.

## अपील क्र.९९/सोलापूर

दि.७.९.१९९० पासून मी कार्यरत असेपर्यंतचा वेतनाचा महिनावार तपशील, भविष्य निर्वाह निधीमध्ये झालेली कपात/जमा, संस्थेचा सेवक असल्यामुळे कारवाई करण्याचे धमकीपत्र मला दि.२१.१२.२००५ रोजी दिले ते कोणत्या आधारे व त्याबाबतची कायद्यातील तरतूद.

## अपील क्र.१०१/सोलापूर

श्री.एम.एम.शेख यांना कोणत्या विश्वस्तांच्या सहीने नियुक्ती आदेश दिले? विश्वस्त अधिकृत आहेत की नाहीत हे पाहण्याची जबाबदारी मुख्याध्यापक यांची नाही का? मनाई हुकूम असताना विश्वस्तांना संस्थेचे व्यवहार पाहता येतात का? कोणत्या नियमाच्या आधारे?

## अपील क्र.१०२/सोलापूर

अनधिकृत विश्वस्त असताना श्री.एम.एम.शेख यांना कोणत्या आधारे कार्यमुक्त करण्यात आले व मला कोणत्या आधारे रुजू करुन घेण्यात आले?श्री.शेख यांच्या बदली संदर्भातील शालेय समितीच्या प्रोसिडिंगवर केलेल्या ठरावाची प्रत, प्रशालेत कार्यरत असलेल्या सर्व कर्मचाऱ्यांची नाव, पद, शैक्षणिक अर्हता इ.माहिती. शिक्षकांचे तासिका वेळापत्रकाची प्रत, प्रशालेत इतिहास, भूगोल अर्हताप्राप्त असलेले शिक्षक आहेत का व विषयात अर्हता नसताना विषय शिकविता येतो का? संस्थेवर मनाई हुकूम असताना सौ.एन.जे.शेख यांच्या मान्यतेकरिता प्रस्ताव पाठविला आहे तो कोणत्या आधारे?

**अपील क्र.९७+१०३/सोलापूर**

दि.८.१२.२००५ रोजी दिलेल्या अर्जावर झालेल्या कार्यवाही उलट टपाली माहिती. बार्शी अँग्लो उर्दू हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, बार्शी येथील प्राध्यापक श्री.इमरान गोलंदाज व काजी व इतर कर्मचारी यांना अधिकृत मान्यता कोणत्या आधारे देण्यात आली? तसेच सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांचेकडून बाब न्यायप्रविष्ट आहे असे पत्र असताना अधिकृत विश्वस्तांबाबत भाष्य करता येत नाही, अशा परिस्थितीत आपणांकडून मान्यता देता येते का?

**अपील क्र.९६/सोलापूर**

अँग्लो उर्दू हायस्कूल, पंढरपूर येथे अनधिकृत विश्वस्त सौ.बेगमपल्ली एम.एम. यांच्या सहीने नियुक्ती दिलेल्या श्री.एम.एम.शेख यांना शासनाची बिगर मागासवर्गीय भरती बंदी असताना कोणत्या आधारे नियुक्ती दिली. वर्तमानपत्रात जाहिरात न देता मुख्याध्यापकांनी कर्मचारी भरती केली असेल तर त्यास मान्यता देता येते का? दि.७.७.१९९५ रोजी शिक्षण संचालनालयाचे जाहिरातीबाबत स्पष्टीकरण व जी.आर. ची नक्कल.

**अपील क्र.१०४/सोलापूर**

अंजुमने तरगीबे तआलीम, अक्कलकोट या संस्थेत न्यायालयीन वाद चालू आहेत ही बाब शिक्षण उपसंचालक, पुणे यांना कळविण्यात आली आहे का? कळविण्यात आली असेल तर प्रत. याबाबत संस्था व शिक्षण उपसंचालक यांच्यात झालेल्या पत्रव्यवहाराच्या नकला. बार्शी शाखेतील श्री.इमरान गोलंदाज यांच्या नियुक्तीस स्थगिती दिलेली आहे. परंतु श्रीमती शेख टी.एम. यांच्या मान्यतेस स्थगिती दिली नाही ते कोणत्या आधारे? पंढरपूर शाखेत अर्हता नसताना इतिहास हा विषय शिकविला जातो तसे शिकविता येते का? आपणाकडील शिक्षण खाते(माध्यमिक) मधील शासकीय माहिती अधिकारी व अपील अधिकारी यांचे नांवानिशी माहिती.

**अपील क्र.१०५/सोलापूर**

माझ्या दि.७.३.२००५ च्या अर्जाच्या मजकुराप्रमाणे जबाबदार चौकशी अधिकारी म्हणून कोणाची नियुक्ती केलेली आहे? तसेच सदर चौकशी केव्हापासून चालू आहे व केव्हा संपणार? निर्णय होण्यास आपणाकडून विलंब का? सन्मती ज्ञानप्रसारक मंडळ हिंदी हायस्कूल, सोलापूर या प्रशालेतील १२ कर्मचाऱ्यांची मान्यता कोणत्या आधारे रद्दबातल करण्यात आली याची माहिती मिळावी.

**अपील क्र.१०६/सोलापूर**

पिठासीन अधिकारी, सोलापूर यांच्या कोर्टात दि.१४ मार्च २००५, अपील क्र.४२५ मध्ये प्रतिज्ञा लेख दाखल केलेला आहे त्यातील मुद्दा क्र.३ मध्ये शिक्षणाधिकाऱ्यांनी दिलेले म्हणणे सत्य व बरोबर आहे का? व त्यानुसार कार्यवाही झाली आहे का? मराठी माध्यम शारीरिक शिक्षक श्री.इलियास अहमद मुजावर यांचे पदोन्नतीस मान्यता कोणत्या आधारे दिली? आपणाकडील पत्र दि.४.३ व १०.३.२००५ हे सत्य व बरोबर आहे का? त्याप्रमाणे कार्यवाही केली आहे का, असल्यास माहिती. आपल्या दि.३ व ४.३.२००५ नुसार आपण विश्वस्तांर्गत वाद असल्याने सध्या या कार्यालयाने कोणत्याही कर्मचाऱ्यास नव्याने मान्यता दिलेली नाही असे आहे व एकीकडे आपण श्री.इलियास मुजावर यांचे पदोन्नतीस मान्यता दिली ती कशी, याची माहिती.

**अपील क्र.१०७/सोलापूर**

दि.६.८.२००५ रोजी मी दिलेल्या अर्जावर झालेल्या कार्यवाहीची माहिती. मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक यांची अधिकृत मान्यता शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडून घ्यावी लागते, त्याबाबतची माहिती. मुख्याध्यापकांना संस्थेची मान्यता नसताना कामकाज पाहणेचा अधिकार पोहोचतो का? कर्मचारी बंदी उर्दू प्रशालेला व संस्थेला आहे का? तसेच उर्दू माध्यमिक शाळांना शिक्षक भरतीत सवलत आहे का? मनाई हुकूम असताना विश्वस्तांना संस्थेचा कारभार पहाता येतो का?

**अपील क्र.१०८/सोलापूर**

संस्थेला ऑडिट संदर्भात दिलेल्या नोटिशीची छायांकित प्रत, संस्थेत गेले बारा वर्षापासून झालेल्या गैरव्यवहाराबाबत संस्थेने संबंधितांवर केलेली कार्यवाही, शासन नियमानुसार संस्थेने ऑडिट केले नाही तर काय कार्यवाही होते, संस्थेचे अधिकृत विश्वस्त कोण आहेत व कोणाला कारभार पहाणेचे अधिकार आहेत, याची माहिती. सौ.बेगमपल्ली एम.एम. यांच्या ११२०/९९ हा बदल अहवाल फेटाळण्यात आलेला आहे.या कालावधीचे ऑडिट सौ.बेगमपल्ली यांना करता येते का? कोणत्या आधारे? शेड्यूल एक वर असलेल्या विश्वस्तांना ऑडिट सादर करणेकामी नोटीस दिलेल्या आहेत. सौ.बेगमपल्ली यांच्या कालावधीतील शेड्यूल एक चे ऑडिटची माहिती.

# विवेचन

अंजुमने तरगीबे तआलीम शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेच्या संदर्भात श्री.मुल्ला अजीमोद्दीन शहाबुद्दीन यांनी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक अँग्लो उर्दू हायस्कूल, पंढरपूर (अपील क्र.१०१ / १०२), अँग्लो उर्दू हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, बार्शी (अपील क्र.९२, ९३,९८,९९,१००), अँग्लो उर्दू हायस्कूल, अक्कलकोट (अपील क्र.९४), जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे (अपील क्र.९७, १०३), जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, सोलापूर(अपील क्र.९६,१०४,१०५,१०७) , जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक; सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, सोलापूर (अपील क्र.१०८) अशी अपिले राज्य माहिती आयोगाकडे केली आहेत. एकाच संस्थेसंबंधी व प्रामुख्याने विश्वस्तांचे अधिकृतपण - अनधिकृतपण या विषयाशी व त्या अनुषंगाने संस्थेत घेतलेल्या निर्णयांशी निगडीत अशी ही अपिले आहेत. त्यामुळे त्यांची एकत्रित सुनावणी घेण्यात आली.

बार्शी प्रशालेत आपण सेवेत असताना दिलेल्या कालबध्द पदोन्नतीच्या ठरावाची अध्यक्ष व इतर पदाधिकाऱ्यांच्या सह्यांसह नक्कल, ठरावाबाबत सेवा पुस्तकात खाडाखोड आहे ती करण्यास मान्यता देणाऱ्या ठरावाची नक्कल, श्री.व्ही.व्ही.पिरजादे; श्री.एम.एम.शेख; सौ.एन.जे.शेख; प्रा.इमरान गोलंदाज; काजी व इतर कर्मचारी यांच्या नेमणुका व त्यांना मिळविलेल्या मान्यता इ. संदर्भात श्री.मुल्ला यांनी विविध अर्जांव्दारे संस्थेकडे माहिती मागितली होती. तसेच संस्थेतील न्यायालयीन वादाची माहिती, विश्वस्त अधिकृत की अनधिकृत, मनाई हुकूम असताना केलेल्या नियुक्त्यांना मान्यता कशाच्या आधारे दिल्या, अशा स्वरुपाची माहिती श्री.मुल्ला यांनी जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, सोलापूर व जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी अधिकारी, सोलापूर यांच्याकडे मागितली होती. आपल्याला अपुरी व दिशाभूल करणारी माहिती दिली, म्हणून त्यांनी त्या त्या ठिकाणच्या अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे अपील केले. परंतु अपिलातही आपल्याला योग्य माहिती मिळाली नाही, तसेच तत्कालीन शिक्षणाधिकारी श्री.वसंत हाके यांनी अपिलाची सुनावणी केली नाही, अशा कारणांवरुन श्री.मुल्ला यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपिले केली आहेत.

सहाय्यक धर्मादाय आयुक्त; लातूर; औरंगाबाद यांच्याकडून संस्थेवर आर्थिक व्यवहार करणे; बँक खाते; शिक्षणविषयक भरती वगैरे बाबींवर मनाई हुकूम आहे हे आपल्याला (मुख्याध्यापक, बार्शी यांना) माहिती आहे काय? मनाई हुकूम असताना नियुक्ती, आर्थिक व्यवहार करता येतात का? पंढरपूरच्या प्रशालेत इतिहास, भूगोल शिकविण्यासाठी अर्हताप्राप्त शिक्षक आहेत का? अर्हताप्राप्त शिक्षक नसताना हे विषय शिकविता येतात का? असल्यास कोणत्या आधारे? अंजुमने तरगीबे तआलीम व इतर संस्थेबाबत दि.७.३.२००५ रोजीच्या आपल्या अर्जानुसार जबाबदार चौकशी अधिकारी म्हणून कोणाची नियुक्ती झाली आहे? चौकशी केव्हापासून चालू झाली व केव्हा संपणार? चौकशी झाली असताना आपणाकडून निर्णय घेण्यास विलंब झाला आहे, या विलंबाची कारणासह माहिती द्यावी, पीठासीन अधिकारी, सोलापूर यांच्याकडे शिक्षणाधिकाऱ्यांनी सादर केलेले प्रतिज्ञापत्र सत्य व बरोबर आहे का? अशा स्वरुपाचे माहितीच्या मागणीतील मुद्दे आहेत. तसेच 'शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या भरतीला बंदी असताना अनधिकृत विश्वस्तांच्या सह्यांनी भरलेल्या कर्मचाऱ्यांना मान्यता दिली व घेतली ही शासनाची फसवणूक नाही का? याला सर्वस्वी जबाबदार कोण?' 'शिक्षकेतर कर्मचारी भरतीस बंदी व कोर्टाचा मनाई हुकूम असताना नियुक्ती दिली हे नियमानुसार आहे का? तसेच हा शासनाचा व कोर्टाचा अवमान व फसवणूक नाही का?' 'खोटे दस्तावेज तयार करुन शिक्षण उपसंचालक, पुणे यांची दिशाभूल करुन अधिकृत मान्यता आणणे ही महाराष्ट्र शासनाची फसवणूक नाही का?' अशा स्वरुपाचे प्रश्नही 'माहितीची मागणी ' म्हणून विचारले आहेत.

अशा स्वरुपाची भाष्यवजा अपेक्षा असलेली विचारणा व विश्वस्त अनधिकृत असून ते बेकायदेशीर कारभार करीत आहेत अशा आरोपांसह मागितलेली माहिती यावर, त्या संदर्भातील भाष्य करणारी, उत्तरवजा माहिती आपण दिलेली नाही. मात्र ठरावाच्या प्रतीसारखी कागदपत्रे दिली, असे सर्व जन माहिती अधिकाऱ्यांनी नमूद केले.

अंजुमने तरगीबे तआलीम शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेच्या बार्शी, अक्कलकोट व पंढरपूर अशा तीन ठिकाणी शाळा आहेत. संस्थेच्या विश्वस्त / संचालक मंडळाची निवडणूक मे २००४ मध्ये झाली. संस्थेतील वादामधून या निवडणुकीनंतरही विश्वस्तांमध्ये शिक्षणाधिकारी

कार्यालय; जिल्हा परिषद, सोलापूर, शिक्षण उपसंचालक कार्यालय; पुणे, धर्मादाय आयुक्त; सोलापूर व लातूर, शाळा न्यायाधिकरण; सोलापूर याबरोबरच जिल्हा व अन्य न्यायालये अशा विविध पातळ्यांवर दावे - प्रतिदावे चालू आहेत. संस्थेचे सध्याचे विश्वस्त मंडळ अधिकृत की अनधिकृत हा वादातील मुख्य विषय असून त्यामुळे संस्थांतर्गत निर्णयाबाबत वाद - प्रतिवाद चालू असतात, हे अपीलकर्ता व उत्तरवादी यांनी सादर केलेल्या विविध कागदपत्रांमधून स्पष्ट होते.

अपीलकर्ता श्री.मुल्ला आजीमोद्दीन शहाबुद्दीन हे संस्थेच्या पंढरपूर येथील शाळेत शिपाई म्हणून कामाला आहेत. जून २००० मध्ये बार्शीच्या शाळेतून त्यांची पंढरपूर येथे बदली झाली. ही बदली रद्द करुन घेण्यासाठी ते संस्थेवर सातत्याने दबाव आणीत असून ते व त्यांचे बंधू मुल्ला गुलाम दस्तगीर आणि त्यांचे अन्य काही सहकारी सातत्याने आपल्याला त्रास देण्यासाठी माहितीच्या अधिकारांतर्गत अर्जांसह विविध प्रकारचे अर्ज करीत असतात, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, अँग्लो उर्दू हायस्कूल श्री.जे.ए.कर्नूल यांनी आयोगापुढील सुनावणीत लेखी व तोंडी केले. अक्कलकोट व पंढरपूर येथील शाळांचे जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनीही याच आशयाचे निवेदन केले. परंतु श्री.मुल्ला यांनी त्याचा इन्कार केला. संस्थेत अनेक गैरप्रकार आहेत. त्याविरुध्द आपण संघर्ष करीत आहोत. बेकायदेशीर पदे रद्द होणे, शिक्षणविषयक भरतीस मनाई हुकूम असतानाही भरती केलेल्या व शिक्षणाधिकारी कार्यालय (माध्यमिक) जिल्हा परिषद, सोलापूर यांच्याकडून अयोग्य प्रकारे मान्यता घेतलेल्या नेमणुका रद्द होणे यासारख्या गोष्टी आपण मिळविलेल्या माहितीच्या आधारे गैरगोष्टी स्पष्ट झाल्यावर घडून आल्या आहेत, असे श्री.मुल्ला यांनी नमूद केले.

संस्थेच्या विश्वस्तांच्या अधिकृत - अनधिकृतपणाबाबत धर्मादाय आयुक्तांकडून वेळोवेळी वेगवेगळी उत्तर दिली गेली आहेत. त्यातील काही निर्णय परस्परविरोधी आहेत, तसेच पुणे विभागाच्या सोलापूर शाळा न्यायाधिकरणाने दिलेला निर्णय, न्यायालयांचे निर्णय या सर्वांमुळे शिक्षणाधिकारी कार्यालयाने माहिती देताना; तसेच संस्थेची कार्यकारिणी व संस्थेने नेमलेले मुख्याध्यापक; शिक्षक; शिक्षकेतर कर्मचारी यांच्याबाबत कार्यवाही करताना संभ्रमावस्था आलेली आहे. त्या त्या वेळच्या परिस्थितीत असलेली माहिती दिलेली आहे. कोठल्या ना कोठल्या निर्णयानुसार ती चुकीची ठरु शकते व त्याला आव्हान दिले जाते, या साऱ्याचा व मोठ्या प्रमाणावर

येणाऱ्या अर्जांचा शिक्षणाधिकारी कार्यालयावर मोठा ताण येत असून आरोप - प्रत्यारोपांमुळे कर्मचाऱ्यांना व अधिकाऱ्यांना मनःस्ताप सहन करावा लागतो. असे अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, सोलापूर श्री.एम.एन.वीर यांनी विस्ताराने लेखी व तोंडी स्पष्ट केले. काही अपिलांची सुनावणी तत्कालीन अपिलीय प्राधिकारी श्री.वसंत हाके यांनी केलेली नाही त्याचे हे कारण आहे, असेही श्री.वीर यांनी नमूद केले. श्री.आजीमोद्दीन शहाबुद्दीन मुल्ला व त्यांचे भाऊ श्री.गुलाम दस्तगीर मुल्ला या दोघांनी दि.१५.४.२००४ ते ३०.१२.२००६ या काळात माहितीची मागणी व अपिले यासह एकूण ७१ अर्ज केले असल्याचे त्यांनी सांगितले. त्याबाबतचा तपशील त्यांनी स्वतंत्र निवेदनाव्दारे आयोगाला सादर केला.

न्यायालयीन प्रकरणे, धर्मादाय आयुक्त कार्यालय, शिक्षणाधिकारी व शिक्षण उपसंचालक कार्यालय अशा विविध पातळ्यांवरील व मुख्यतः माहितीच्या अधिकाराखाली श्री.मुल्ला व त्यांचे बंधू यांनी सुमारे १५० अर्ज संस्थेकडे या कालावधीत केले असल्याचे संस्थेच्या जन माहिती अधिकाऱ्यांनी सांगितले.

संस्थेमध्ये गैरप्रकार आहेत, अनधिकृत विश्वस्त बेकायदेशीर कारभार करीत आहेत, तसेच आपली बदली सूडबुध्दीने केली, आपण पदोन्नतीला पात्र असतानाही आपल्याला पदोन्नती नाकारली जात आहे, त्यामुळे भ्रष्टाचार उघड करण्यासाठी व बेकायदेशीर गोष्टी थांबविण्यासाठी आपण विविध पातळ्यांवर अर्ज करीत आहोत, त्यामुळे एवढे अर्ज केले आहेत, असे प्रतिपादन श्री.मुल्ला यांनी केले. भ्रष्टाचाराला पाठीशी घालण्यासाठी आपल्याला जाणूनबुजून माहिती नाकारली जात आहे, असेही त्यांनी नमूद केले.

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय विभाग, सोलापूरमधील तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा प्रभारी अधीक्षक श्री.यू.पी.जडे यांनी श्री.मुल्ला यांना आवश्यक ती माहिती दिली आहे, असे विद्यमान जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक श्री.का.भा.धावारे यांनी सांगितले. या संस्थेच्या संदर्भात न्यायालयामध्ये दावे दाखल असून न्यास नोंदणी कार्यालयाकडील आवश्यक ती माहिती देण्यात आली असल्याचे अपिलीय प्राधिकाऱ्यांचे प्रतिनिधी श्री.डी.बी.पवार यांनी सांगितले.

श्री.मुल्ला हे पंढरपूरच्या शाळेत शिपाई असूनही काम सोडून सतत परगावी जाणे, कामावर असताना अशा प्रकारचे अर्ज व त्या संदर्भातील अन्य कामे करणे हेच प्रामुख्याने करीत असतात,

असा आरोप जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक श्री.एस.एम.कुमठे यांनी केला. परंतु हा संस्थेचा अंतर्गत भाग असून संस्थेने त्याबाबत कोणत्याही स्वरुपाची कारवाई त्यांच्यावर केली आहे का, अशी विचारणा आयोगाने केली असता श्री.कुमठे यांनी नकारार्थी उत्तर दिले. अशा स्थितीत असे आरोप निराधार व निरर्थक ठरतात, याची जाणीव आयोगाने श्री.कुमठे यांना करुन दिली.

संबंधित सर्व पक्षांची निवेदने व अपीलकर्त्यासह सर्वांनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता पुढील बाबी स्पष्ट होतात :

(१)संस्थेचे विद्यमान विश्वस्त / संचालक अधिकृत आहेत की अनधिकृत आहेत, हा या सर्व विषयातील मुख्य प्रश्न आहे. अपीलकर्त्याच्या मते ते अनधिकृत असल्यामुळे त्यांचे सर्व निर्णय व कृती बेकायदेशीर ठरतात. विश्वस्त अधिकृत आहेत, असे संस्थेच्या जन माहिती अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. न्यायिक स्वरुपाच्या विविध मंचांचे निर्णय वेगवेगळ्या स्वरुपाचे असल्यामुळे शिक्षणाधिकारी व शिक्षण उपसंचालक कार्यालय याबाबतचे नेमके उत्तर देऊ शकत नाहीत.

(२)त्या त्या वेळी असलेली परिस्थिती व नियम यानुसार कार्यवाही केली, हे अपिलीय प्राधिकाऱ्यांचे म्हणणे रास्त आहे.

(३)संस्थांतर्गत वादातील एक भाग म्हणून माहितीच्या अधिकाराचा वापर अपीलकर्त्याकडून केला जात आहे, तर या वादापोटीच ठरावाच्या प्रतीसारखी देय माहितीही संस्थेतर्फे नाकारली जात आहे. मात्र माहितीची मागणी करणाऱ्या अर्जांचे प्रमाण, माहितीचा मागितलेला तपशील व सन १९९० ते २००५ या दरम्यानचा कालावधी हे सर्व लक्षात घेता अत्यंत विस्तृत माहिती अपीलकर्त्याने मागितली आहे.

(४)'खोटे दस्तावेज तयार करुन दिशाभूल करुन मान्यता आणणे ही फसवणूक नाही का?' 'अनधिकृत विश्वस्तांच्या सहीने नेमणुका करता येतात का?' अशासारखे आरोप अंतर्भूत असलेले प्रश्न माहितीचा अधिकार अधिनियमातील 'माहिती'च्या व्याख्येत बसत नाहीत. आपण केलेले भाष्य मान्य करणारे उत्तर मिळाले तर ती योग्य माहिती, असा अपीलकर्त्याचा दुराग्रह त्याच्या निवेदनामधून दिसतो. तो योग्य नाही.

वरील बाबींचा विचार करुन आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

## आदेश

(१) भाष्य अथवा खुलासा अपेक्षित नसलेली, नेमकी द्यावयाची राहिलेली माहिती नमूद करणारे निवेदन अपीलकर्त्याने जन माहिती अधिकाऱ्यांना सादर करावे. हे निवेदन सादर केल्यापासून पंधरा दिवसांत देय माहिती अपीलकर्त्यास जन माहिती अधिकाऱ्यांनी द्यावी.

(२) वरील संदर्भातील कार्यवाहीची जबाबदारी अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) श्री.एम.एन.वीर यांची राहील. त्यांनी दि.२५.१२.२००७ पर्यंत पूर्तता अहवाल आयोगाला सादर करावा.

(३) प्रथम अपिलाची सुनावणी करुन आदेश पारित करणे आवश्यक आहे, याची समज तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) श्री.वसंत हाके, अपिलीय प्राधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, सोलापूर श्री.ए.एम.अंबाळकर व अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे श्री.टी.एन.लोंढे यांना देण्यात येत आहे.

(४) विषयाचे स्वरुप, अपेक्षित 'माहिती' म्हणून नमूद केलेले मुद्दे, माहितीची व्याप्ती व अनुषंगिक परिस्थिती लक्षात घेता अपीलकर्त्याची नुकसानीबाबतच्या मागणीची व जन माहिती अधिकारी यांना शास्ती लावण्याची मागणी अमान्य करण्यात येत आहे.

(५) केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चा उपयोग या कायद्याचा गाभा लक्षात घेऊन गंभीरपणे व विवेकाने करणे आवश्यक आहे, वैयक्तिक लाभाच्या विषयासाठी दबावाचे साधन म्हणून त्याचा वापर अपेक्षित नाही, याची समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे

पुणे
दि. ३०.११.२००७